RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ९, अंक २२] शनिवार, मार्च २५, २०२३/चैत्र ४, शके १९४५ [पृष्ठे ७, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक २८**

**प्राधिकृत प्रकाशन**

### उप विभागीय अधिकारी, डहाणू, उप विभाग - डहाणू, जिल्हा - पालघर

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९(१) ची**

**अधिसूचना**

क्रमांक डीपी/भूसं/DFCC उड्डाणपूल/अधिसूचना ११(१)/कावि-४२/२०२३.—शासन निर्णय क्रमांक पीएलएन-२०१६/सीआर -(६०२)/ नि-३, मंत्रालय, मुंबई ४०००३२ नुसार पालघर जिल्हा, डहाणू तालुक्यातील पश्चिम रेल्वे वरील रेल्वे फाटक रेल्वे लेव्हल क्रॉसिंग क्र.५५ कि.मी.१४३/३४७, ४७६ चिंचणी, वाणगांव, आशागड आंबेसरी वर सा. क्र.८/२०० मध्ये रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम करणे. (रामा-७५)

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत, करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) मधील कलम ३ च्या खंड (इ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसूचित केले आहे, उक्त अधिनियमाच्या कलम ३, खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा अधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समूचित शासन असलेल्या पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याचे स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे आणि म्हणूनच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदी अन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तिंचे विस्थापन करण्यास भाग पडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे ;

त्याअर्थी, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाहीः

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल अशी तरतूद आहेः

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) नुसार जिल्हाधिकारी, भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क ( महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश 'उक्त नियमन' असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (०३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ चा खंड (छ) समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, डहाणू उप विभाग, डहाणू यांस पदनिर्देशित केले आहे.

**परिशिष्ट - १**

**डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर अंतर्गत सुरू असलेल्या रेल्वे उड्डाणपुलाच्या उर्वरित जागेचे संपादनाकरिता प्रस्ताव मौजे-वाणगांव, ता.डहाणू, जि. पालघर**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गाव | सर्वे नंबर | क्षेत्रफळ (हे. आर/चौमी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | डहाणू | वाणगाव | ४०/१ पै | ०.०२६४ |
| | | | | ८३ पै ४२ | ०.००९२ |
| | | | | ३१पै१/२/१ | ०.००८० |
| | | | | ३७ अ पै ३७१+५/१+६/१+७ | ०.०२११ |
| | | | | ३६ पै १३ | ०.००३९ |
| | | | | १७ पै १ | ०.०४०५ |
| | | | | ९२ पै ११ | ०.००६६ |
| | | | | ७२पै९/२ व ७२/१४/२ | ०.१०६१ |
| | | | | ७२ पै १० | ०.०२४७ |
| | | | | ७२ पै १४ | ०.१४३१ |
| | | | | ९२ पै ७ | ०.१३२० |
| | | | | ९२/९ पै | ०.२३७७ |
| | | | | ९२/६ पै | ०.१४२९ |
| | | | | ९२/८ पै | ०.२४८१ |
| **एकूण** | | | | | **१.१५०३** |

## मौजे चिखले, ता. डहाणू, जि. पालघर

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गाव | सर्वे नंबर | क्षेत्रफळ (हे. आर/ चौमी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | डहाणू | चिखले | १५०/८ | ०.६०१२ |
| | | | | २१५/७ | ०.१४७६ |
| | | | | १३७/७ | ०.०३६० |
| | | | | १३७/४ | ०.१३८० |
| | | | | १३७/९ | ०.०१३५ |
| | | | | १३७/८ | ०.०६२० |
| | | | | २१५/२ | ०.०२५८ |
| | | | | १०६/२ | ०.११९० |
| | | | | १०६/१ | ०.१०८८ |
| | | | | १३७/६ | ०.०७२९ |
| | | | | १०६/४ | ०.०१३८ |
| | | | | २१५/३ | ०.०३४२ |
| | | | | १३८/१२ | ०.१४५६ |
| | | | | १३७/२ | ०.१२१० |
| | | | | १३७/३ | ०.०७१० |
| | | | | १३७/५ | ०.०१.६० |
| **एकूण** | | | | | **१.७२६४** |

## मौजे - झाई, ता. तलासरी, जि. पालघर

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गाव | सर्वे नंबर | क्षेत्रफळ (हे. आर/चौमी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | तलासरी | झाई | ३०/४ | ०.०७४३ |
| | | | | ४९/१ | ०.२१२९ |
| | | | | ४९/५ | ०.०१५९ |
| | | | | ४९/७ | ०.१३६९ |
| **एकूण** | | | | | **०.४४००** |

## मौजे - ब्राम्हणगाव, ता. तलासरी, जि. पालघर

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गाव | सर्वे नंबर | क्षेत्रफळ (हे. आर/चौमी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | तलासरी | ब्राम्हणगाव | १०७/१७ | ०.०९८६ |
| | | | | १०९/१ | ०.१४४८ |
| | | | | ११२/२ | ०.०६०६ |
| **एकूण** | | | | | **०.३०४०** |

## अनुसूची २

## सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नाव | डीएफसीसी रेल्वे उड्डाणपूल |
| प्रकल्पाचे वर्णन | डहाणू तालुक्याच्या हद्दीत मौजे वाणगांव, चिखले, येथील एकूण अंदाजित संपादन क्षेत्र २.८७६७ चौ.मी. व तलासरी तालुक्यातील मौजे - झाई, ब्राम्हणगाव येथे एकूण ०.७४३९ चौ. मी. चा प्रकल्प आहे. |
| समाजाला मिळणारे लाभ | रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.<br>स्थानिक लोकांना त्यांचे कौशल्य आणि अनुभव यानुसार त्या जागेतील प्रचलित नियमानुसार रोजगाराच्या संधी मिळतील. |

## अनुसूची तीन

## बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

१. प्रकल्पाचे बांधकाम

२. प्रकल्पाचे परिचालन

३. प्रकल्पाची देखभाल.

## अनुसूची चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

शासन निर्णय क्रमांक पीएलएन-२०१६/सीआर-(६०२) / नि-३, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ नुसार पालघर जिल्हा, डहाणू तालुक्यातील पश्चिम रेल्वे वरील रेल्वे फाटक रेल्वे लेव्हल क्रॉसिंग क्र.५५ कि.मी. १४३/३४७, ४७६ चिंचणी, वाणगांव, आशागड आंबेसरी वर सा. क्र.८/२०० मध्ये रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम करणे. (रामा- ७५) द्वारे भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यामध्ये कलम १० क समाविष्ट केले असून त्यामध्ये अशी तरतूद केली आहे की, समुचित शासनाला जनहिताच्या दृष्टीने अधिसूचनेद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देता येते. त्यानुसार **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण क्रमांक ३०, दिनांक ३० जानेवारी २०२३ नुसार **उक्त प्रकल्पाला** जनहिताच्या दृष्टीने **लोक हितकारी प्रकल्प असल्याकारणे,** प्रकरण दोन आणि प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आली आहे.

**अनुसूची- पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| अ | प्रशासन म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी कार्यालय, डहाणू |
| ब | प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता | डहाणू आगरोड, कॉटेज हॉस्पिटल जवळ, आगर-डहाणू, ता. डहाणू, जि. पालघर पिन कोड ४०१ ६०१ |
| क | ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसूचनेचा तपशील (M) | मा. जिल्हाधिकारी, पालघर (भूसंपादन शाखा) यांचेकडील पत्र जा. क्र. भूसंपादन/कक्ष-१/टे-१/कावि-९०७/२०२२, दिनांक २० ऑक्टोबर २०२२ अन्वये, उप विभागीय अधिकारी, डहाणू यांची प्रशासक, पुनर्वसन व पुनर्स्थापना म्हणून नियुक्ती करणेत आली आहे. |

सदर अधिसूचनेव्दारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याचे कलम ११ चे उप कलम (०१) खाली अधिसूचीत करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, डहाणू विभाग, डहाणू यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**श्रीमती संजीता महापात्र**,
सक्षम प्राधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी,
डहाणू विभाग, डहाणू.

डहाणू,
दिनांक ९ मार्च २०२३.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.